म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ८७६

...कमिटीनें पास केलेलीं

भारत मराठा

# मावळी मेळ्याचीं पद्यें



REFBK-0019516
REFBK-0019516

...नानुजी राक्षे,
... पेठ, पुणें.

१९५१६

मुद्रक—अनंत सखाराम गोखले,
'विजय' प्रेस, १७० शनवार पुणें.

किंमत १ आणा.

स्थलप्रत
मराठी ग्रंथ संग्रहालय
१९५१६

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

## भारत मराठा

# मावळी मेळ्याचीं पदें

### पद पहिलें.

माझें नमन गणाधीशा। हीच आशा नको करूं निराशा।
तूं ईशा ॥ १ ॥
तुजविण कोणी नसे जगीं या। मजशी ताराया गणेशा।
हीच आशा मी करितों देवा। चरणीं परमेशा ॥ २ ॥
येती संकटें नेशी लयाला। समर्थ नच मज या वेळेला।
[illegible] करितों ही आशा ॥ ३ ॥

++ ++

REFBK-0019516
REFBK-0019516

### पद दुसरें.

वंदितो तुजशी गजवदना। येउंदे आमुची करुणा ॥१॥
दयाघन तूंची भगवंता। आम्हांसी संकटीं आतां।
तारा दीना या नाथा। दयाळो दया करा आतां ॥२॥
देश हा पेटला भारी। उपाशी मरती नरनारी।
तुझ्याविण कोण रे तारी। संकटीं तार तूं हारी ॥३॥
तुजविण कोण या जनता। कृपाळू दुजा ही नसता।
बालका आस ही आतां। पूर्ण करिसी भगवंता ॥४॥

++ ++ ++

## पद तिसरें.

हर हर शंभो गिरजापतिला । नमन करितों देवा तुजला ।
लीन हें बालक तव सेवेला । सद्गुरुराया राखा मजला १
ब्रह्मांडीं तूं भरला असे की । तुजविण कोणी जगीं नसे कीं
सद्‌बुद्धी तूं या बालाची । पूर्ण कराया समर्थ तूंची २

++ ++ ++

## पद चवथें.

इंग्रजी राज्यीं । नांदवले लोक । बनले व्यसनी पाजी ॥१॥
कोणी घेई चहा कांहीं । पिती हुस्की ब्रांडी ॥
ब्रांडीवरती खाया लागते । नरम कोंबडीचीं अंडीं ॥२॥
अकलेची बहु खान वाढली । झाला बी.ए.एम.डी. ॥
देशाची नच काळजी मूर्खा । उडवी मोटारगाडी ॥ ३ ॥
साहेबी फुल ड्रेस करुनी । बीज गोऱ्याचें सजलें ॥
पांढरपेशे मजा मारिती । फटफटीवरतीं डुले ॥ ४ ॥
भल्याभल्याशी । कुणी पुसेना । या दुष्टांचें बनलें ॥
दुनयेवरती। इंग्रजी राज्य । बंड तेंचि मातलें ॥ ५ ॥
पाखांड्यांनीं आस्तीकाला । बुद्धिमंद केलें ॥
भारत गीता । रामायण तें । सांदीमधें पहा पडलें ॥ ६ ॥
नाटक सीनेमा । नाच तमाशा । यांमधें लोक रंगले ॥
पैक्याचें या । मोल कुणाला । शष्प कळेनासें झालें ॥ ७ ॥
विलायती तो । माल घेउनी । लोक सर्व भुलले ॥
धर्मनीतिचें । नांव निघेना । अनीतिचें फावलें ॥ ८ ॥

ग्रंथ नं. ८०५

रोगराईनें । दुष्काळ धाडुनी । वाटोळें तें केलें ॥
गुरा-ढोरांचा । फडशा पडला । पाणी सर्व आटलें ॥ ९ ॥
कुणाच्याही । मनामधें । प्रेम मुळीं न उरलें ॥
व्यासमुनीचें । भविष्य हें । सर्व खरोखर झालें ॥ १० ॥
लवाट्यांचा । दास विनवून । या जनतेसी बोले ॥
आतां तरी । सावध व्हा व्हा । नयन ठेवा खुले ॥ ११ ॥

++ ++ ++

## पद पांचवें.

माझें नमन भारतभूला ॥ जाऊं शरण श्रीशिवबाला ॥ १ ॥
अवतार जगावर पहिला । हिंदूधर्म सांभाळण्याला ॥
रक्षिलें हिंदु जनतेला ॥ २ ॥
स्वराज्य-स्थापक तूंची । दया असे तुज अंबेची ॥
तोडिलें मोंगलपाशाला ॥ ३ ॥
यवनांचा जुलूम हा झाला । हिंदुधर्म बुडूं लागला ॥
शिवबा त्या वेळेला । येई जन्मा शिवनेरीला ॥ ४ ॥
केलें रक्षण तूं धर्माचें । राखिलें ब्रीद क्षत्रियाचें ॥
असे जगीं तयाचा बोलबाला ॥ ५ ॥
ती वेळ अशा समयाला । येउनी तोडी पाशाला ॥
आलों शरण हिंदमातेला । शिवबा की जयजय बोला ॥ ६ ॥

++ ++ ++

## पद सहावें.

चल गडे जाउं शाळेला । शिक्षण शिकुनी ।
बहुत फायदा होतो मनाला ॥ १ ॥

स्वतंत्रतेची। सवडची मिळते।
हवें तसें वळण्याला ॥ २ ॥

टापटीपीची बहु हौसेची। मजा होय मला।
सुंदर शोभा। फडके प्रभा।
दिपवी जनतेला ॥ ३ ॥

मॅट्रिक एल. एल. बी. होतां क्षणीं। खुर्ची बसण्याला।
कितीएक नादी। फंदी शोकी।
लागतील गळाला ॥ ४ ॥

मनास वाटेल। तैसे भेटेल। सुख चैनी करण्याला।
परतंत्रता जळो गेली।
लेडी म्हणतिल मजला ॥ ५ ॥

नर्स डाक्टरीण स्वतंत्रतेचा धंदा हातीं आला।
पण बदमाषगिरीचा फ्यॅाशन जर हा
रोगी मधें नडला ॥ ६ ॥

++ ++ ++

## पद सातवें.

कलीराज मातला फार बिघडला धर्म अवघा विचार॥१॥
याला कारण पांढरपेशे होत।
दुजोरा इंग्रजी शिक्षण देत ॥
पहिल्या रहाटीला मारी लाथ।
नवीन नकली फ्याशन ती घेत ॥
युरोपियनच्या वागे विजात।
म्हणुनी झाला सर्व घात ॥ २ ॥

ही रीत लागे सर्व पहा स्त्रियांस ।
आणि तैशी मुलाबाळास ॥
माता रूढी विसरली खास ।
टेनिस क्रिकेट लावी खेळण्यास ॥
चहाचा घोट पाजिती त्यास ।
गेली शक्ती खरोखर खास ॥ ३ ॥

धोतर गेलें विजार घाली पायीं ।
डोइला बुरडी टोपडें राही ॥
यस् फ्यास करण्यांत त्याची घाई ।
स्वभाषा सोडुनी देई ॥
चष्मा लेण्यांत हौस पाही ।
तेलप्याचा बैल सजुनी येई ॥ ४ ॥

जोड्याला नाहीं उरला जनांत मान ।
पायीं बुट स्टाकिन दिसे छान ॥
दुंगणाखालीं फटफटीचें वाहन ।
मिजासीनें सरड चाले धावुन ॥ ५ ॥

ही मोठमोठ्या पंडितांची आस ।
यानें झाला राष्ट्राचा नाश ॥
नसे भीति कुणाची त्यास ।
जो तो लागे सुख चैनीस ॥
दारूचा घ्यावा लागतो ढोस ।
वर चणचणीत पाहिजे मांस ॥
वकील बारिष्टरची ही आस ॥ ६ ॥

अहो आमचे शिकलेले मोठमोठे पंडित ।
जाउन पडे नर्क कुंडांत ॥
पहा लष्करच्या हो वाटेंत ।
कुणी इराणीच्या हाटेलांत ॥
लवाट्यांचा दास हें वदत ॥ ७ ॥

++ ++ ++

## पद आठवें.

जय जय म्युनिसिपालिटी । जय जय कचरा तूं पेटी ॥१॥
नगर भवानी अंबे । कीर्ती असे तव मोठी ॥ २ ॥
गरीब जन फार । परदेशी पोर ।
पालन करिसी तूंही उपचार ॥ ३ ॥
जनहितावर । तुझा अवतार । लोकमताहून ।
तुला प्रियकर सरकार ॥ ४ ॥
परकी फ्याशनची चाल । रुचे तुज सालोसाल ।
नूतन लग्नाची चाल । मेंबर नवरा खुर्चीचा काळ ॥ ५ ॥
सभेत लंब्या बाता ॥ मेंबराशिपकरतां ।
प्रश्न लायकी आतां । कधीं खराटा वागविला होता ॥६॥
जरी मेंबर होते । कळकळ कोणा नसते ।
पण सरकारचेही ते पित्ते ॥ ७ ॥
जना रक्षुन । प्राणापरी जपून ।
तव आज्ञेविण । न घडे प्रेताचें दहन ॥ ८ ॥

ग्रा. क्र. १०५१६

नव्या इमारती । मन मोहुनी अती ।
सुंदर शोभा दिसती । सडका नायकिणी जशा असती ९
तव अधिकारी । सत्ता आयका भारी ।
राग भयंकर बोळाघरीं ॥ १० ॥
लठ्ठ पगाराला । अधिकारी अडला ।
सुखसोईचा गाडा । खड्ड्यामधीं जाउन तो पडला ॥११॥
पाणी नसे मिळत । गोरगरीबांत ।
न्हावी तसा तिथ । पाण्यावांचून हजामत करीत ॥१२॥
नवा कर चढवा । जनतेवरी बसवा ।
उधळ्यांना हंसवा । अधिकाऱ्यांचा काढावा रुसवा १३
सत्ता हातीं असतां । त्यांत स्वार्थ पहातां ।
मुत्सद्दी म्हणतां । हा टेंभा उगीच मिरवीतां ॥ १४ ॥
घरभंगीपट्टी । पान तमाखूपट्टी ।
उपांग फीपट्टी । मेल्या मुडद्यावर द्या पैसापट्टी ॥१५॥
रहिवाशाचे म्हणुनी । प्रतिनिधी निवडूनी ।
गौरव आनंदानीं । बक्षीस द्यावी त्यांना केरसुणी ॥१६॥

++ ++ ++

## पद नववें.

करामत मोठी । यवनाची दाटी ।
दुष्ट तो अति । शिवबासाठीं ।
जाळ्यांत सिंह अडकवून तो घेतो भेटी ॥ १ ॥
सदा औरंगजेब कष्टी । मोठा कपटी ।
तहाच्या अटी । काळें पोटीं ।
घालुनी मनामध्यें ठेवी सर्व गोष्टी ॥ २ ॥

शिवराज मोठा चतुर । होता बहादूर ।
कधीं नच फितूर । जयासिंग भेटी ।
प्राण घातला स्वदेशकार्यासाठीं ॥ ३ ॥

शिवाबाई त्याला प्रसंन्न ।
जिजाबाई दान । वरद हस्तानं ।
देऊन शिवबा ये तूं संभाळुन ॥ ४ ॥
बोलावून सर्व सरदार । भरला दरबार ।
पेशवे सुरनीस । मुजूमदार ॥
निवडुनी सर्व अध्यक्ष । घेण्याला मोक्ष ॥
दिल्लीचा रस्ता धरतो स्वार ॥ ५ ॥

प्रतापरावा । तुझ्या हातीं दिलें ॥
माता आणि । पुत्र राज्यास ॥
संभाळी इमान तूं आपल्या कूळगोत्रास ॥ ६ ॥

॥ चाल ॥ धारकरी मावळे संगें बरोबर ॥
चार हजार निवडून घेतले प्राण देणार ॥
एका दिलानें सर्वत्रही ते लढणार ।
मारा म्हणती दुष्मना मागें कधीं न पहाणार ॥
निकरानें लंगोटे पहा कसे लढणार ॥ ७ ॥

करनाटकी कोंगाडे । आणिक मावळे ॥
आडमुठ । होते घोगडे ॥
घेउनी संगतीला रामोशी मांगाडे ॥ ८ ॥

बडेबडे मानकरी खरे । येसाजी बरे ॥
होते तानाजी मालुसरे । हिरोजी राघो मित्र ॥
घाडगे पुत्र । महाल्या जिवा होते हुजरे ॥ ९ ॥

जयसिंग कंठीचा हार । महाराजासी प्यार ॥
  द्वेष नच अंतरीं तिळभर । रामसिंगा पत्रीं मजकूर ॥
लिहून तैयार । महाराजा म्होर ॥ १० ॥
रायगड तक्त पाछाई । छत्रपती राही ॥
  महाडिक होते हो देसाई ।
एकाचढ एक शिपाई होते त्या ठायीं ॥ ११ ॥
संगीनानें मार्गे न हटती । बिलंदर तुटती ॥
  असे झटती । एकाहाती ॥
पहा एका नेम धर्मानें सर्वजण तुटती ॥ १२ ॥
खऱ्या हिंदूधर्माचा वीर । कीं देउन शीर ॥
  दक्षिणचा नर । निघाला म्होर ॥
चालला बादशहा भेट देण्यास तो स्वार ॥ १३ ॥
  गाजीखान होता सरदार । वाटाड्याबरोबर ।
  दक्षिणचा वीर । होता बहादूर ।
महालकरी कीं मोकासदार सेवेस तत्पर ॥ १४ ॥
  जागजागीं गेली असे वर्दी ।
  पहाण्याची गर्दी । तो लोकांची होत असे फार ।
  जय जय बोलती चोहोंकडे गजर ॥ १५ ॥
॥ चाल ॥ फिरविली कीं महाराजांनीं चोहिंकडे वर्दी ।
  जमविले सर्व सरदार झाली गर्दी ॥
  गोळा करून सर्व सैन्या जमविती मेळा ।
  कडेकोट बंदोबस्तांत भरून दारू गोळा ॥ १६ ॥
खालु कर्णे वाजूं लागले । कीं डंके दिले ।
  कीं सैन्यावरती ।
  दिली अटकेवरती झेंडे पहा चढाविती ॥ १७ ॥

त्या दिवशीं भरून दरबार। सारे सरदार।
सजवुनी जराकी मधे डुले।
जातां जातां उधळिलीं सोन्याचीं फुलें ॥ १८ ॥
साफसीखान। कपटी कृतघ्न। महाराजाउन।
भेट नच देई।
दिलदार मनाचा मनांत ठेवुन जाई ॥ १९ ॥
त्याचा पुतण्या परत लावुनी। त्या शिवबांनीं।
जयसिंग वाड्याचा रस्ता।
धरुनीया सुभेदारास शरण आणि हस्ता ॥ २० ॥
शिवाजींची पहा चतुराई। शिस्त ती पाही।
अकस्मात किल्ल्यावर जाई।
झड गनिमाची मागें येई। आंत मज घेई।
परीक्षा पाही ॥ २१ ॥
किल्लेदार मोठा शहाणा। नको तुझा बहाणा।
महाराजाची सक्त मला ताकीद।
गनिमाचा कावा जरी आला। थोपवीन त्याला
पाहूं उद्याला ॥ २२ ॥
महाराजाची झाली खातरी। मोठी बहादुरी।
राज्य राखतील हे दुरवरी। विश्वास पटवुनी खास
वाटे दिलास। मारूं मोगलास ॥ २३ ॥
महाराजांनीं हुशारी पाहून। लायकीवरून।
चढविले किल्लेदारावरती। दिलाचा संशय फिटून।
गेला मिटून। दरबारचा रस्ता ते धरती ॥ २४ ॥
घेउनी हातीं समशेर। नंगी तलवार।
दिलीला निघाला स्वार। जागजागीं घेत पानविडे।
लोक चोहोंकडे। पहाती वीर ॥ २५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य नं. ८०५

हा औरंगजेब दुष्ट। करितसे कष्ट । शिवाजीसाठीं ।
भरविला मोठा दरबार बोलाविले भेटी ॥ २६ ॥

जागजागीं तरवारीचे पहारे ठेवुनी ।
नंग्या समशेरी उघड्या अशा लावुनी ॥
अंगामध्यें चिलखत झग्यावरती घालुनी ।
जनानखान्यांत सर्व स्त्रिया पहा जमवुनी ॥२७॥

महाराजांचें तेज अप्रतिम । निसा बेगम ।
पाहुनी भाळली महाराजा। पण उपाय कांहीं चालेना ।
अविवाहितपणा । व्यर्थ तिचा गेला ॥ २८ ॥

बादशहांनीं देणगी देऊन । लालुच दावुन ।
महाराजांनीं धिक्कार तिचा केला। कडेकोट बंदोबस्तांत ।
शास्तखान त्यांत । गांठुन जखमी करून गेला ॥२९॥

शिवाजीनें समाजावुन सांगून ।
विनंती करून । औरंगजेबा ।
झाला करार तुमचा आमचा सोडवा ताबा ॥ ३० ॥

तो आट्टल लुच्चा फार । करुनी कहर ।
छळितो शिवाजीराजाला । शिवबा मोठ्या धीराचा ।
खंबीर मनाचा । भीति नच त्याला ॥ ३१ ॥

शिवराय युक्तिचा फार । बांधुनी जोर ।
लढविली मोठी शकल । गुरुवार व्रत पतकरून ।
मिठाई भरून । देत दानाला ॥ ३२ ॥

वेळवाचे पेटारे करून। मिठाई भरून ।
देतसे औरंगरिबाला । इनाम बक्षीसें देऊन ।
गाफील करून । निघून जाण्याला ॥ ३३ ॥

आपल्या लोकांस वर्दी देऊन। जावें निघून।
त्याविण कार्य न होणार। असे कैक बहाणा करून।
गेले निघून। लोक सारे ॥ ३४ ॥
हिरोजी फर्जंद मोठा होता हुशार।
असा दुजा नोकर कोणी नसे मिळणार॥
जीव जावो राहो आज्ञा नच करणार ॥ ३५ ॥
महाराजाचा घेउनी वेष। निजला बेहुष।
महाराजा खुला केला त्यांनीं। दोन पेटारांत बैसुनी।
बापलेकांनीं। गेले निघुनी ॥ ३६ ॥
चोहोंकिडे झाला कल्लोळ। औरंगजेबा कळ।
जीव तळमळ। पिंजऱ्यांतून गेला पोपट।
नाहीं बोभाट। पाय आपटीत ॥ ३७ ॥
अशी ठेवा करून करणी लोकांच्या स्मरणीं।
तुम्हा विनवितों।
लवाट्याचा दास चरणीं तमच्या लोळतो ॥३८॥

REFBK-0019516
REFBK-0019516

समाप्त.

ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. १८५१६
संग्रह शाखा